**नियमित दिवाणी दावा क्र.** - ३३/२०१५

सुकदेव चंदु नेटारे . . . वादी

**विरूध्द**

भगवान भिका नेटारे व इतर . . . प्रतिवादी

**निशाणी क्र. ५ वरील आदेश**

(घोषित दिनांक - १६/०२/२०१७)

१. वादीने सदर दावा मौजे वाहेगांव साळ, ता. चांदवड येथील गट क्र. ५५०/२ याची वाटणीसाठी दावा दाखल केला असून सोबत **निशाणी क्र. ५** अन्वये मनाई हुकूम मागितलेला आहे व दाव्याच्या निकालापावेतो प्रतिवादींनी सदरची मिळकत इतर कोणालाही विक्री करू नये अथवा हस्तांतर करून नेये अथवा बोजा निर्माण करू नये अशाप्रकारचा मनाई हुकूम मागितला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ याने **निशाणी क्र. ३१-अ** अन्वये सदरच्या अर्जास खुलासा दिला असून वादीचे सर्व कथन नाकारले आहे. त्याने असे नमुद केले आहे की, सदर मिळकतीत वादीचा काहीही एक हक्क व अधिकार नसल्याचे नमुद केलेले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज रद्द करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी क्र. २ ते ४ यांनी देखील **निशाणी क्र. ३२** अन्वये सदरच्या अर्जास खुलासा दिला असून त्यानेदेखील वादीचे सर्व कथनांना समर्थन दिलेले आहेत.

३. अर्ज व म्हणणे यामध्ये आलेल्या कथनांवरुन खालील वादबिंदु विचाराकरिता माझ्यासमोर उपस्थित झाले व त्याची कारणमिमांसा मी पुढीलप्रमाणे देत आहे -

| अ.क्र. | वादबिंदु | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | नकारार्थी. |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने जातो काय ? | नकारार्थी. |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादीची अपरिमित अशी हानी होईल काय ? | नकारार्थी. |
| ४ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

४. दोन्ही पक्षकारांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. २ ते ४ तर्फे युक्तीवाद करण्यात आला नाही.

### <u>वादबिंदु क्र. १ करिता</u> -

५. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मुळ पुरूष राघु केदु नेटारे यांना दोन मुले होती, त्यात एक अंबू व दुसरा चंदु. अंबुचा मुलगा भिका असून भिकाचा मुलगा भगवान म्हणजेच प्रतिवादी क्र. १ आहे. तसेच चंदुचा मुलगा वादी सुकदेव हा आहे. प्रतिवादी क्र. २ व ३ हे त्याचे सख्खे भाउ व बहिण आहेत. त्याने पुढे असे नमुद केले आहे की, मुळ सर्व्हे क्र. - ११७ चाहाजी शहाजी मांग व मयत राघो केदु यांच्या मालकीचा होता. त्यांच्या दोन गांवी शेतजमिनी होत्या. पाणेवाडी, ता. नांदगांव येथील मिळकतीत अंबु व चंदु म्हणजेच अनुक्रमे प्रतिवादी क्र. १ व वादी यांचे आजोबा यांच्यात अर्धा हिश्याची वाटणी योग्य प्रकारे झालेली आहे व त्यात पाणेवाडीतील मिळकतीत देखील मयत अंबु यांचा वडिल भाउ म्हणून एकत्र कुटुंब कर्ता या नात्याने नांव लागलेले होते. एकत्र कुटुंब कर्ता हे नांव दर्शविले नसले तरीदेखील त्याच नात्याने त्याने त्याचे नांव लागले असल्यामुळे त्या मिळकतीत योग्य रितीने वाटणी झालेली आहे. तथापि, वाहेगांव साळ, ता. चांदवड येथील मुळ सर्व्हे क्र. ११७ यालादेखील अंबु याचे नांव वडिल मुलगा म्हणून एकत्र कुटुंबाच्या वतीने लागले असतांना त्याचा गैरफायदा घेवून त्या राघोला कुठलाही हिस्सा न देता सदरची मिळकत अंबुचा नातु प्रतिवादी क्र. १ भगवान याने परस्पर त्याचे नांव लावून घेतले असून त्यासंदर्भात नोंद क्र. ३५७ बेकायदेशीररित्या हस्तगत केलेली आहे. त्यामुळे त्या मिळकतीमध्ये वादीचा व प्रतिवादी क्र. २ ते ४ यांचा हिस्सा असून दाव्याच्या निकालापावेतो केवळ खरेदीविक्री व अन्य व्यवहाराला मनाई हुकूम देण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

६. प्रतिवादी क्र. १ तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, मुळात सदर गट क्र. ५५०/१ हीचा मुळ सर्व्हे क्र. ११७ असून त्यात मुळ कर्ता पुरूष राघो केदु याचा कुठल्याप्रकारचा संबंध नव्हता. त्याने दाव्यासोबत मुळ सर्व्हे क्रत्र ११७ चा क, ढ, इ पत्रक दाखल केले असून त्याचे आजोबा अंबु राघो मांग याचे नांव जात इनाम म्हणून नमुद दर्शविलेले असून त्यांना शासनाने ती जमिन इनाम म्हणून दिलेली होती व त्याचा नजराना देखील त्याने भरलेला होता.

त्यामुळे सर्व्हे क्र. ११७ च्या गट स्किम उतारा लागू झाल्यानंतर त्याला गट क्र. ५५० देण्यात आला असून त्यावेळीदेखील त्याच्या आजोबाचे नांव त्यामध्ये दाखल झालेले आहे. त्यात अंबु राघो याचा भाउ चंदु राघो याचा काहीही संबंध नव्हता. त्यामुळे त्यांना सदरील जमिनीमध्ये हिस्सा देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

७. दोन्ही पक्षकारांचा युक्तीवाद सविस्तर ऐकण्यात आला. मुळातच इतक्या वर्षांनंतर आजरोजी पुर्वीचा मालकी हक्क ठरवितांना अत्यंत काळजीपूर्वक सर्व दस्तऐवज बघेणे अपेक्षीत आहे. निश्चितपणे वादीतर्फे पाणेवाडी, ता. नांदगांव येथील एकत्र कुटुंबाच्या शेतांचे उतारे व नोंदी दाखल करण्यात आलेले आहे. त्या सर्वांमध्ये प्रतिवादी क्र. १ च्या आजोबांचे नांव अंबु राघो असे लावले असून ते एकत्र कुटुंबाच्या वतीनेचे लावले असल्याचे स्पष्ट दिसून येते. गट स्किम योजना लागू होईपावेतो साधारणतः मोठया मुलाचे नांव एकत्र मिळकतीच्या कुटुंबाला लावले जात होते ही महाराष्ट्रातील पद्धत देखील लक्षात ठेवणे आवश्यक आहे आणि त्याच एका कारणामुळे सदर वाहेगांव साळ येथील वादातील मिळकतीवर अंबु राघो याचे नांव एकत्र कुटुंबाच्या वतीनेचे लागले आहे असा युक्तीवाद हा अत्यंत प्रबळ व समर्थनीय युक्तीवाद ठरतो. परंतु केवळ त्याच एका कारणामुळे वाहेगांव साळ येथील मिळकत ही एकत्र कुटुंबाची होती हा अंतिम निष्कर्ष काढणेदेखील योग्य ठरू शकत नाही. त्यासाठी अनेक कारणे नमुद करता येवू शकते.

८. मुळात वाहेगांव-साळ, ता. चांदवड येथील मिळकतीसंदर्भातील एकही असा दस्तऐवज वादीने दाखल केलेले नाही की ज्यामध्ये मुळ पुरूष राघो याचे नांव मिळकतीवर लागलेले आहे अथवा त्याचा काही संबंध दर्शविण्यात आलेला आहे. याउलट प्रतिवादी क्र. १ याने **निशाणी क्र. ३६** सोबत क, ड, इ याची सत्यप्रती सादर केलेली असून त्यामध्ये मुळ सर्व्हे क्र. ११७ याच्या क, ड, इ पत्रकावर शेवटून दोन क्रमांकाला इतर मालकांसोबत अंबु राघो याचे नांव लागल्याचे स्पष्ट दिसून येते. शिवाय शेत पुस्तकाची देखील प्रत प्रतिवादी क्र. १ ने सादर केलेली असून त्यामध्ये अंबु राघो याचे नांव मिळकतीला लागल्याचे दिसून येते. त्या नोंदी दि. २८/०६/१९६१ रोजी प्रमाणित झाल्याचे स्पष्ट दिसते. त्यावर बंडींग तारण देखील घेतल्याचे स्पष्ट दिसून येते. जुना सर्व्हे क्र. ११७ चा सन १९४२-१९४३ चा उतारा देखील प्रतिवादी क्र. १ ने सादर केलेला असून त्यात देखील अंबु राघो याचे नांव मिळकतीवर लागल्याचे दिसून येते. सन - २०११ मध्ये फेरफार नोंद क्र. १५९० नोंदवित असतांना त्यात देखील अंबु राघोचे नांव

लागले असून सदरचे काम करत असतांना वादीला सदर नोंदीबाबत माहिती झाल्यामुळे त्याने तब्बल ५० ते ६० वर्षांनंतर सदरचा दावा आणल्याचे स्पष्ट होते. राघो हा कधी मयत झाला याबाबत वादीने कुठलेही कथन केलेले नाही. गट स्किम योजना लागू होत असतांना देखील अंबु राघोचे नांव त्यावेळी मिळकतीला देण्यात आले होते व त्यावेळी देखील वादी अथवा त्याच्या वडिलांना सदर गोष्टीला कुठलीही हरकत घेतलेली नव्हती. चंदु राघो हा इतक्या वर्षे का शांत राहिला याचे कुठलेही उत्तर वादीकडे नाही.

९. प्रथमदर्शनी सर्व कागदपत्रे हे प्रतिवादी क्र. १ च्या बाजूने आहेत. वादीच्या बाजूने केवळ पाणेवाडी, ता. नांदगांव येथीलच दस्तऐवज काही प्रमाणात समर्थक ठरतात, परंतु ते पुरेसे आहेत असे म्हणता येवू शकत नाही. सदर मिळकतीवर मुळात प्रतिवादी क्र. १ चा ताबा गेल्या अनेक वर्षांपासून असून वादीच्या ताब्यात दावा मिळकतीची वाद मिळकत नाही ही बाब देखील दोन्ही पक्षकारांना सर्वमान्य आहे. ताब्याबाबत सर्वात महत्वाच्या मुद्दयावर दोन्ही वकिलांनी समाधानकारक भर देणे आवश्यक असतांना तो मुद्दा फारसा चर्चेस न घेता त्याबाबत उपरोक्त ताब्याबाबत सर्वमान्य बाब केवळ कथन केलेली आहे आणि त्यामुळेच वादीने ताब्याबाबत काहीही मागणी न करता केवळ सदरची मिळकत विक्री अथवा हस्तांतरीत करण्यात मनाई मागितली आहे. तसा मनाई हुकूम देणे फारसे नुकसानकारक नाही असे प्रथमदर्शनी वाटत असले तरी देखील पुरेश्या कागदपत्रांअभावी ती मिळकत एकत्र कुटुंबाची गृहीत धरून मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादी क्र. १ चे अतोनाथ नुकसान होण्याची शक्यता आहे. कारण इतक्या वर्षांनी वादीला अचानक जाग येणे व अचानकपणे हुकूम मागणे हे एखादया ख-या मालकाविरूध्द अत्यंत त्रासदायक ठरू शकते. प्रतिवादी क्र. १ हा अनेक वर्षांपासून व अनेक पिढयांपासून ती जमिन त्याच्या ताब्यात आहे. सदर मिळकतीवर त्याचे नांव लागलेले आहे. ***भारतीय पुरावा कायदा कलम ११०*** प्रमाणे ज्याच्या ताब्यात मिळकत आहे व तो मालक नाही असे सिद्ध करण्याची जबाबदारी वादीची ठरते. वादीचे पानेवाडी, ता. नांदगांव येथील कागदपत्रे सदरची बाब सिद्ध करण्यास पुरेशी नाही. उलट प्रतिवादी क्र. १ चे कागदपत्रे पुर्णपणे त्याचा मालकी हक्क दर्शवितात असे धरले नाही तरीदेखील त्याचा सदर जमिनीवर अनेक वर्षांपासून ताबा असल्यामुळे तो मालक आहे असे गृहित धरण्यास कुठलीही बाधा राहणार नाही.

१०. त्यामुळे वादीचे व प्रतिवादी क्र. १ चे दस्तऐवज बघितले असता व सर्वात

महत्वाचे त्याला निश्चितपणे कर्ज काढण्याचे, तारण ठेवण्याचे, जमिन विकसित करण्याचे अथवा स्वतःच्या गरजेप्रमाणे विल्हेवाट लावण्याचे अधिकार आहे. त्यावर मनाई आणल्या कर्ज घेवून शेती करणे त्याला कठीण होईल व त्यामध्ये कोणाचाही फायदा होणार नाही याउलट मनाई हुकूम न दिल्यास वादीचे कुठलेही नुकसान होणार नाही. कारण त्याचा ताबा त्या जमिनीवर नाही. शिवाय लिस पेन्डसि प्रमाणे त्याचे हक्क व अधिकार देखील अबाधित राहतात. त्यामुळे मी **वादबिंदु क्र. १ ते ३** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**<u>वादबिंदु क्र. ४ करीता</u>** -

११. उपरोक्त कथनाप्रमाणे वादीला मनाई हुकूम न दिल्यास त्याचे फारसे नुकसान होणार नाही व दाव्याची गुंतागुंत वाढू शकते. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर होणे आवश्यक असून स्वभाविकच सदरचा अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट होणे योग्य ठरणार आहे. त्यामुळे **वादविंदु क्र. ४** करीता खालील आदेश पारित करत आहे. -

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज **निशाणी क्र. ५** रद्द करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

दिनांक - १७/०२/२०१७

(**के. जी. चौधरी**)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, चांदवड.